# प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून सराईत गुन्हेगारास ०१ गावठी कट्टा व ०१ जिवंत काडतुस सह अटक

दि. १६/०८/२०१८ रोजी खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी हे कोथरुड पोलीस स्टेशनचे हद्दीत अँन्टी चेन स्नॅचिंग पेट्रोलिंग करीत असताना पौड रोड, वनाज कंपनीजवळील रस्त्यावर आले असता, खंडणी विरोधी पथकातील पोलीस हवालदार पांडुरंग वांजळे यांना त्यांचे विश्वासू बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे गोंविद पसलवाड हा सदर रस्त्यावर उभा असून त्याने विक्रीसाठी एक गावठी कट्टा व ०१ जिवंत काडतुस आणले असून ते जवळ बाळगून आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. राहुल घुगे व स्टाफने सापळा रचुन गोविंद प्रकाश पसलवाड, वय-२० वर्षे, व्यवसाय- काही नाही, रा.मु.पो.उरावडे, ता.मुळशी, जि. पुणे मूळ पत्ता- मु.पो.सरसमगाव, ता.हिमायतनगर, जि.नांदेड यांस पकडून त्याचे कब्जातुन ०१ गावठी कट्टा व ०१ जिवंत काडतूस असा एकूण किं.रु. १०,१००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहे. सदरबाबत कोथरुड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील आरोपी हा पौड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण गुरंनं २१४/२०१८ भादवि कलम ३०७,३४ या गुन्हयामध्ये फरारी होता.

**वरील कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रदिप देशपांडे साो पोलीस उप-आयुक्त श्री. शिरीष सरदेशपांडे साो, सहा. पोलीस आयुक्त श्री. समिर शेख साो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, पोलीस उप-निरीक्षक राहुल घुगे, पोलीस कर्मचारी हनुमंत गायकवाड, धिरज भोर, रमेश गरुड, उदय काळभोर, महेश कदम, मनोज शिंदे, संतोष मते, शिवानंद बोले, फिरोज बागवान, अमोल पिलाने यांनी केलेली आहे.**